


नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशीय शिक्षण संस्था, सावनेर द्वारा संचालित

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्न

# राम गणेश गडकरी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय सावनेर

**त. सावनेर, जि. नागपूर**

E-Mail : rggmsaoner@gmail.com, College website :- www. ramganeshgadkaricollege.org

:- राम गणेश गडकरी कॉलेज




# माहिती पुस्तिका

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त

# राम गणेश गडकरी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय सावनेर

## विद्यापीठ गीत



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे।
दे वरचि असा दे।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,
मतभेद नसू दे ।।धृ।।

नांदोत सुखे गरिब-अमिर एक मतानी।
मग हिंदू असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी।
स्वातंत्र्यसुखा या सकलांमाजि वसू दे।
दे वरचि असा दे।।१।।

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना
हो सर्वस्थळी मिळूनि समुदाय-प्रार्थना।
उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे।
दे वरचि असा दे।।२।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी।
खळ-निंदका मनीही सत्य न्याय वसू दे।
दे वरचि असा दे।।३।।

सौंदर्य रमो घर घरात स्वर्ग ज्या परी
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीती बोहरी
तुकड्यास सदासर्वदा सेवेत कसू दे।
दे वरचि असा दे।।४।।

:: माहिती पुस्तिका प्रकाशक ::
**प्राचार्या**
राम गणेश गडकरी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय
सावेनर, जि. नागपूर, दूरध्वनी क्र.: ८६६८३०५३६०

आमचे प्रेरणास्थान



**श्री. मधुकररावजी टेकाडे**
अध्यक्ष
नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशिय
शिक्षण संस्था, सावनेर

# अध्यक्षांचे मनोगत

शिक्षणाचा प्रसार हा समाजातील सर्वच स्तरापर्यंत पोहचला पाहिजे. शिक्षणाची ही ज्ञानधारा तळागाळापर्यंत पोहचून ग्रामीण विद्यार्थी हा ज्ञानामृत व्हावा, असा दृढ संकल्प मनाशी बाळगून नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशिय शिक्षण संस्था, सावनेर द्वारा संचालीत राम गणेश गडकरी कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय, सावनेर या महाविद्यालया द्वारे सावनेर क्षेत्रामध्ये शिक्षण प्रसाराचे कार्य अविरत सुरु आहे. संस्था शिक्षणाच्या संख्यात्मक तसेच गुणात्मक उत्थानासाठी पुर्णपणे प्रयत्नशील आहे. महाविद्यालया तर्फे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधा देण्यात येतात. त्याचप्रमाणे गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना दरवर्षी गुणवत्ता पारितोषीक देवून गौरवण्यात येते. महाविद्यालयाद्वारे देण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक सुविधांचा विद्यार्थ्यांनी आवश्यक तो लाभ घेऊन भविष्यामध्ये एक आदर्श सुसंस्कारीत नागरीक म्हणूनच या महाविद्यालयातून तो समाजात प्रवेश करेल. अशी अपेक्षा करुन प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या यशस्वितेसाठी मी शुभेच्छा इच्छितो.

धन्यवाद!

आमचे मार्गदर्शक



**प्रा. विजय एम. टेकाडे**
एम.ए., एम.फील, एम.एड्.
सचिव
नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशिय
शिक्षण संस्था, सावनेर

# सचिवाचे मनोगत

विद्यार्थ्यामध्ये सुप्त कलागुण दडलेले असतात. या सुप्त गुणांना योग्य दिशेने विकसीत करणे आवश्यक असते. याकरिता महाविद्यालयात विविध शालेय उपक्रमांचे आयोजन केल्या जाते. शैक्षणिक उपक्रमासोबतच आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये विद्यार्थ्यांने आपले स्थान समर्थपणे टिकवून ठेवावे व स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात तो कुठेही कमी पडू नये या करिता महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे स्पर्धात्मक परीक्षेचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना वेळोवेळी देण्यात येते. दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी हे महाविद्यालय कटीबद्ध असून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीच्या यशस्वीतेसाठी व भविष्यासाठी मी शुभेच्छा देतो.

धन्यवाद!

# प्राचार्यांचे मनोगत



**प्र. प्रा. एस. पी. ताजने**
एम.ए., (समाजशास्त्र), नेट, सेट

प्रिय,

विद्यार्थी मित्रांनो,

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या राष्ट्रातील नागरिकांवर अवलंबून असतो, असे सुजान चारित्र्यसंपन्न, सुसंस्कृत, प्रतिभावान, कर्तुत्ववान, कर्तव्यनिष्ठ आदर्श नागरिक निर्माण करणे हे शिक्षणाचे मुलभूत उद्दीष्ट आहे. याकरिता शिक्षणाचा प्रसार शहरी भागाबरोबरच ग्रामिण भागातही झपाट्याने होत असल्याचे आपल्या निदर्शनास येत असले तरीही, आजही ग्रामिण क्षेत्रामध्ये उच्च शिक्षणाच्या संधी पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने व आर्थिक विवंचनेमुळे दुरवर उच्च शिक्षणाकरिता जाऊ शकत नसल्याने ग्रामिण भागातील अनेक विद्यार्थी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणापलिकडे शिक्षण घेवू शकत नाही त्यामूळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास येत होते.

सदर समस्या जाणून नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशिय शिक्षण संस्था सावनेर चे विद्यमान अध्यक्ष श्री. मधुकरराव टेकाडे यांच्या अथक प्रयत्नातून ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण दर्जेदार उच्च शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी व राष्ट्रविकास उपयोगी आदर्श नागरिक निर्माण व्हावे या एकमेव ध्येयाने शैक्षणिक सत्र २००९-१० मध्ये सावनेर येथे ''राम गणेश गडकरी कला-वाणिज्य महाविद्यालय, सावनेर'' या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

महाविद्यालयाच्या स्थापनेला १६ वर्षे पूर्ण झाली असून याशिवाय प्रतिवर्ष शैक्षणिक सहलीचे आयोजन औद्योगिक केंद्रांना भेटी, वार्षिक स्नेहसम्मेलन, विद्यापीठ स्तरावरील क्रीडा स्पर्धा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे १० दिवसीय शिबीराच्या माध्यमातुन ग्राम सफाई , व्यसनमुक्ती, महिला मेळावा ई. चे आयोजनातुन विद्यार्थ्यात समाजसेवेची भावना वृध्दीगंत करण्याचा प्रयत्न जयंती व पुण्यतिथीचे आयोजन महाविद्यालयातील वैशिष्टे ठरली आहेत.

अर्थातच महाविद्यलयाने अल्पावधीत जी ऊत्तुंग भरारी घेतली आहे त्यामागे संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकररावजी टेकाडे, संस्थेचे सचिव प्रा. विजयराव टेकाडे यांच्या अथक प्रयत्न, प्रेरणा व सतत मार्गदर्शनातुनच हे शक्य झाले आहे.

सदर महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विद्यार्थीनी कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत हे मागील शैक्षणिक सत्रातील अनुभवावरुन सिद्ध झालेले आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा, बौद्धिक वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याची चमक दाखविली आहे. याचे श्रेय या महाविद्यालयातील प्राध्यापकांना जाते.

निसर्ग नियमानुसार लहान रोपट्याचे कालांतराने मोठ्या वटवृक्षात रुपांतर होतच असते, त्याच नियमाला अनुसरुन बाल्यावस्थेत असलेले आमचे महाविद्यालय देखील मोठ्या वटवृक्षात विकसित होईल याची मला पूर्ण खात्री आहे. महाविद्यालयाच्या विकासासाठी महाविद्यालयीन व्यवस्थापन, विद्यार्थी, पालक, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या अथक परीश्रमाची, प्रयत्नांची आवश्यकता असते. त्याकरिता या महाविद्यालयातील कोणताही घटक कमी पडणार नाही याची मला शाश्वती आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी हे महाविद्यालय निरंतर प्रयत्नशील राहील आणि या महाविद्यालयातून प्रत्येक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे एक आदर्श नागरिक बनूनच बाहेरच्या जगात प्रवेश करुन समाज आणि राष्ट्र विकासाच्या राष्ट्रीय कार्यात सहकार्य करतील असा मला आत्मविश्वास आहे.

धन्यवाद !

नोंदणी क्र. - एफ. २२६४०

# नंदकृपा ग्रामीण विकास बहुउद्देशीय शिक्षण संस्था, सावनेर

## कार्यकारी मंडळ

| | नाव | पद |
|---|---|---|
| १) | श्री. एम. जे. टेकाडे | अध्यक्ष |
| २) | श्री. डी. पी. डहाके | उपाध्यक्ष |
| ३) | श्री. व्ही. एम. टेकाडे | सचिव |
| ४) | सौ. एल. एम. टेकाडे | सहसचिव |
| ५) | श्री. डी. जी. कोल्हे | कोषाध्यक्ष |
| ६) | श्री. डी. एम. तवले | सदस्य |
| ७) | सौ. डी. व्ही. टेकाडे | सदस्य |

## राम गणेश गडकरी कला - वाणिज्य महाविद्यालय सावनेर

### महाविद्यालय विकास समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम. जे. टेकाडे | व्यवस्थापन अध्यक्ष |
| २) | प्रा. व्ही. एम. टेकाडे | व्यवस्थापन सचिव |
| ३) | सौ. डी. व्ही. टेकाडे | व्यवस्थापक सदस्या |
| ४) | प्रा. एस. पी. ताजने | प्राध्यापिका |
| ५) | प्रा. डॉ. आर. एन. कोरेकर | विभागप्रमुख |
| ६) | प्रा. एस. एम. बुरडे | प्राध्यापक |
| ७) | प्रा. एस.जी. गायकवाड | प्राध्यापिका |
| ८) | श्री. व्ही. आर. फलके | शिक्षकेत्तर कर्म. प्रतिनीधी |
| ९) | प्रा. बी. डी. निकोरे | शिक्षण विभाग |
| १०) | श्री. डी. एम. धोटे | उद्योजक |
| ११) | डॉ. आर. पी. ढवळे | संशोधन विभाग |
| १२) | श्री. डी. पी. डहाके | समाजसेवक |

## राम गणेश गडकरी कनिष्ठ महाविद्यालय सावनेर

### शाळा समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम. जे. टेकाडे | अध्यक्ष |
| २) | श्री. डी. पी. डहाके | व्यवस्थापन सदस्य |
| ३) | प्रा. व्ही. एम. टेकाडे | व्यवस्थापन सदस्य |
| ४) | श्री. भागवत सर | नामनिर्देशित सदस्य |
| ५) | प्रा. एन. डी. निखाडे | शिक्षक प्रतिनीधी |
| ६) | प्रा. एस.पी. ताजने | प्राचार्या / सचिव |
| ७) | श्री. जी. आर. मोंढे | शिक्षकेत्तर कर्म. प्रतिनीधी |

समन्वयक गुणवत्ता हमी समिती महाविद्यालय परिषदेचे सभापती व सचिव महाविद्यालयाचे प्राचार्य या समितीचे पदसिध्द सचिव

## महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

### शिक्षक वृंद वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. एस. पी. ताजने | प्रभारी प्राचार्या |
| २) | प्रा. डॉ. आर. एन. कोरेकर | इतिहास प्राध्यापक |
| ३) | प्रा. एस. एम. बुरडे | वाणिज्य प्राध्यापक |
| ४) | प्रा. एस.पी. ताजने | समाजशास्त्र प्राध्यापिका |
| ५) | प्रा. डॉ. एम.एस. फुले | इतिहास अंश. प्राध्यापिका |
| ६) | प्रा. जी. डी. माडेकर | इंग्रजी अंश. प्राध्यापक |
| ७) | प्रा. सी. जी. गायकवाड | इंग्रजी अंश. प्राध्यापक |
| ८) | प्रा. व्हि. डब्लू. ठाकरे | अर्थशास्त्र अंश. प्राध्यापिका |
| ९) | प्रा. एन. ठाकरे | मराठी अंश. प्राध्यापिका |
| १०) | प्रा. ए. डी. देशमुख | मराठी अंश. प्राध्यापिका |
| ११) | प्रा. डी. ए. बोबडे | वाणिज्य अंश. प्राध्यापिका |
| १२) | प्रा. के. आर. उमाटे | वाणिज्य अंश. प्राध्यापिका |
| १३) | प्रा. के. एस. बावने | वाणिज्य अंश. प्राध्यापक |
| १४) | प्रा. के. बोरीकर | राज्यशास्त्र अंश. प्राध्यापक |
| १५) | प्रा. ए.एस. चिमलवार | ग्रंथपाल अंश. प्राध्यापिका |
| १६) | प्रा. के.के. खुबाळकर | शारिरीक शिक्षक अंश. प्राध्यापक |

### शिक्षक वृंद कनिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. पी. एन. नानवटकर | मराठी/समाजशास्त्र क. महा. शिक्षिका |
| २) | प्रा. के. एस. बोरीकर | इतिहास/राज्य. क. महा. शिक्षक |
| ३) | प्रा. जे.एस. चरपे | भौतिकशास्त्र क. महा. शिक्षिका |
| ४) | प्रा. पी. बी. बावणे | वाणिज्य क. महा. शिक्षिका |
| ५) | प्रा. एन. डी. निखाडे | इंग्रजी क. महा. शिक्षक |
| ६) | प्रा. के. आर. उमाटे | वाणिज्य क. महा. शिक्षिका |
| ७) | प्रा. एम. ए. सावजी | वाणिज्य क. महा. शिक्षिका |
| ८) | प्रा. आर. एम. घुगल | जीवशास्त्र क. महा. शिक्षक |
| ९) | प्रा. आर. डी. पानतावने | रसायणशास्त्र क. महा. शिक्षक |
| १०) | प्रा. व्ही. डब्लु. ठाकरे | हिंदी क. महा. शिक्षिका |
| ११) | प्रा. ए. एम. गायधने | गणित क. महा. शिक्षक |
| १२) | प्रा. के.के. खुबाळकर | शारिरीक शिक्षक, क. महा. शिक्षक |

### शिक्षकेत्तर कर्मचारी

१) श्री. व्ही. आर. फलके – लिपीक

२)श्री. पी. एम. करांगळे – शिपाई

३) श्री. जी. आर. मोंढे – शिपाई

## आमच्या महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- कला, वाणिज्य आणि विज्ञान ज्ञानशाखांमधील कनिष्ठ तसेच कला वाणिज्य पदवी शिक्षणाची सोय.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला आणि व्यक्तिमत्व विकासाला पोषक वातावरण.
- सुसज्ज नविन प्रशस्त इमारत व भव्य क्रीडांगण
- संमृद्ध ग्रंथालय, सुसज्जित संगणक लॅब, सुसंपन्न क्रीडा विभाग, भरगच्च सांस्कृतिक उपक्रम
- रोज सकाळी राष्ट्रगीत व प्रार्थनेने महाविद्यालयाचा आरंभ.
- स्वयंशिस्त, सद्वर्तन आणि नैतिक संस्कारांना विशेष प्राधान्य.
- निसर्गरम्य आणि आल्हाददायक वातावरण.
- स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन

## उद्दिष्ट्ये

आमच्या महाविद्यालयाचे उद्दिष्ट मागासलेल्या भागातील व विशेषतः खेड्यापाड्यातील गरीब विद्यार्थांमध्ये प्रसार व प्रचार करुन चारित्र्य संपन्न, सक्षम व आदर्श विद्यार्थी व नागरिक निर्माण करणे हे आहे.

### महाविद्यालयाचे ध्येय :

वरील उद्दिष्टांच्या पूर्तीकरिता महाविद्यालयाने खालील ध्येय निश्चित केली आहेत.

१) स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मानवता या मानवी जीवनमूल्यांचा विद्यार्थ्यांवर संस्कार करणे.

२) चारित्र्य संपन्न, शीलवान व शिस्तप्रिय विद्यार्थी निर्माण करणे.

३) मूलभूत कर्तव्य पालन करणारा सक्षम नागरिक निर्माण करणे.

४) जीवनातील संकटांना धैर्याने तोंड देण्याची सिद्धता निर्माण करण्याकरिता युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, व्यावहारिक ज्ञान व आत्मविश्वासाचा विकास करणे.

५) सामाजिक बांधिलकीचा दृष्टिकोन निर्माण करणे.

६) विभिन्न खेळ व क्रीडांचे प्रशिक्षण देऊन सुदृढ युवक निर्माण करणे.

७) विद्यार्थ्यांमधील सुप्त कला-गुणांचा विकास करणे.

## पालकांसाठी नम्र निवेदन

आपल्या पाल्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे ह्या उद्देशाने आपण त्यांचा या महाविद्यालयात प्रवेश करु इच्छित आहात. त्यांचा अभ्यास व दैनिक कार्यक्रम ह्या विषयात आपणास निश्चितच रुची आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या मौलिक कार्यात आम्हाला आपले सहकार्य लाभेल ही अपेक्षा आहे.

आपण महिन्यातून कमीत कमी एकदा तरी महाविद्यालयातील प्राध्यापकांना किंवा प्राचार्यांना भेटून आपल्या पाल्याचा अभ्यास, त्याची प्रगती, दैनिक उपस्थिती व त्याची वर्तणूक इत्यादींबाबत चौकशी करावी.

आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, आपण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासात अपेक्षित सहकार्य करुन महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा अशीच पुढे चालू ठेवण्यास निश्चित मदत कराल. हीच अपेक्षा...

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १ दिनांक १५ जून २०१३ अन्वये इ. ११ वी, १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान व वाणिज्य (इंग्रजी माध्यम) या शाखेस शासनाची मंजूरी प्राप्त झाली असुन सदर अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयात शिकविले जातात. तसेच आमच्या महाविद्यालया मार्फत विज्ञान शाखेच्या मुलांना स्टेट बोर्ड सोबतच शासना मार्फत घेण्यात येणाऱ्या NEET, JEE, MH-CET, AI-PMT अशा वेगवेगळ्या प्रवेश पात्रता परिक्षेविषयी विशेष मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी महाविद्यालया तर्फे आठवड्यातून एक दिवस वेगवेगळ्या तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन दिल्या जाते. तसेच वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता CA, CS, ICWA, MBA अशा विविध अभ्यासक्रमा करिता मार्गदर्शन केले जाते.

## कनिष्ठ महाविद्यालयात शिकविले जाणारे अभ्यासक्रम

### कला शाखा (Arts)
इ. ११ वी १२ वी माध्यम मराठी

- English
- Marathi
- History
- Economics
- Sociology
- Political Science
- Environment Edu.
- Health & Physical Edu.

### वाणिज्य शाखा (Commerce)
इ. ११ वी १२ वी माध्यम इंग्रजी/मराठी

माध्यम : मराठी / इंग्रजी

- English
- Marathi / Hindi
- Economics
- Accountancy
- Secretary Practice
- Organization of Commerce
- Environment Edu.
- Health & Physical Edu.

### विज्ञान शाखा (Science)
इ. ११ वी १२ वी माध्यम इंग्रजी

- English
- Marathi / Hindi
- Physics
- Chemistry
- Maths
- Biology
- Environment Edu.
- Health & Physical Edu.

## प्रवेश घेतांना भरावे लागणारे शुल्क
## कनिष्ठ महाविद्यालयात इ. ११ वी. व १२ वी. करिता प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला खालीलप्रमाणे शुल्क भरावे लागेल.

| अनु. क्र. विवरण | कला शाखा माध्यम मराठी | वाणिज्य शाखा माध्यम मराठी | वाणिज्य शाखा माध्यम इंग्रजी | विज्ञान शाखा माध्यम इंग्रजी |
|---|---|---|---|---|
| १) प्रवेश फी | ३०० | ३०० | ३०० | ३०० |
| २) शिक्षण शुल्क फी | १२०० | १२०० | ४८०० | ७२०० |
| ३) सत्र शुल्क | ४०० | ४०० | ४०० | ४०० |
| ४) ग्रंथालय शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ५) प्रयोगशाळा शुल्क | - | - | - | - |
| ६) खेळ आणि क्रीडा शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ७) महाविद्यालय परीक्षा शुल्क | ३०० | ३०० | ३०० | ३०० |
| ८) ओळखपत्र शुल्क | ५० | ५० | ५० | ५० |
| ९) इतर शुल्क | २०० | २०० | २०० | २०० |

# वरिष्ठ महाविद्यालयात शिकविले जाणारे अभ्यासक्रम

## कला विभाग :

बी.ए. : प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष या तिन्ही वर्गासाठी (सेमिस्टर पॅटर्न)

**आवश्यक विषय :** १) इंग्रजी
२) मराठी
३) राज्यशास्त्र

**ऐच्छिक विषय :** १) इतिहास किंवा समाजशास्त्र
२) मराठी वाड्.मय /इंग्रजी वाड्.मय/ अर्थशास्त्र

सुचना : १)रा.तु.म. नागपूर विद्यापीठव्दारे निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमानुसार पदवी परिक्षेकरिता एकुन सहा सत्र (सेमिस्टर) परिक्षा होतील.
२) महाविद्यालयात जे विषय शिकविले जातात, त्याच विषयांची निवड करावयाची आहे व तेच विषय विद्यापीठ परीक्षा फॉर्ममध्ये नमुद करावे लागतील.
३) प्रत्येक सेमिस्टरनुसार विद्यापीठ परिक्षा फॉर्म भरावे लागेल.

## वाणिज्य विभाग :

| B.Com. - I | | B.Com. - II | | B.Com. - III | |
|---|---|---|---|---|---|
| Sem - I | Sem - II | Sem - III | Sem - IV | Sem - V | Sem - VI |
| 1) English 2) Com. Appli. for Business<br>3) Environmental Studies<br>4) Ind. Economic & Business Model<br>5) Co-Curricular Courses<br>6) Principal of Business Management<br>7) Element of Business Environment<br>8) Foundation of Financial Account (OE1)<br>9) Star-up Support Executive | 1) Marathi<br>Major - Commercial Laws<br>Minor- Intro. to Comm.<br>2) Element of Statistic (OE1)<br>3) Constitution of India<br>4) E-commerce & M-Commerce (OE2) | 1) Major1 - Intro to Acc. Process<br>2) Major2- Acc. for Special Trans.<br>3) Mijor- Busi. Eco.(Micro Eco.)<br>4) OE- Professional Ethics<br>5) VSE - Under Business Docu.<br>6) Marathi<br>7) FP - Field Project<br>8) CC- NSS, Sports, Cultural | 1) Major1 - Finanical Acc.<br>2) Major2- Elements of Cost<br>3) Mijor- Busi. Eco.(Micro Eco.)<br>4) OE- Intro. of International Trade<br>5) SEC - Warehouse Supervisor<br>6) AEC- English<br>7) CEP- Community Engagement Pro.<br>8) CC- NSS, Sports, Cultural | 1) Financial Accounting<br>2) Tax Procedure & P.<br>3) Human Resource Mag.<br>4) Agricultural Eco<br>5) Cost Accounting<br>6) Mercantile Law -I | 1) Financial Accounting<br>2) International Economics<br>3) Advance Statistic<br>4) Managerial Accounting<br>5) Mercantile Law - II<br>6) Marketing Process |

टिप : १) एकदा घेतलेले विषय प्राचार्याच्या परवानगी शिवाय बदलता येणार नाहीत. शिल्लक जागा आणि विद्यार्थ्यांचा कल लक्षात घेऊनच अशी परवानगी मिळू शकेल.
२) महाविद्यालयात जे विषय शिकविले जातात, त्याच विषयांची निवड करावयाची आहे व तेच विषय विद्यापीठ परीक्षा फॉर्ममध्ये नमुद करावे लागतील.
३) प्रत्येक सेमिस्टरनुसार विद्यापीठ परिक्षा फॉर्म भरावे लागेल.

# प्रवेश घेतांना भरावे लागणारे शुल्क

महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला खालील प्रमाणे शुल्क भरावे लागेल.

| क्र. | विवरण | कला | वाणिज्य |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश फि | १३७/- | १३७/- |
| २ | ग्रंथालय शुल्क | ४१२/- | ४१२/- |
| ३ | खेळ व क्रीडा शुल्क | ३००/- | ३००/- |
| ४ | विद्यापीठ नोंदणी शुल्क (प्रथम वर्ष) | १५१/- | १५१/- |
| ५ | फॉर्म फी | १०/- | १०/- |
| ६ | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क | ३००/- | ३००/- |
| ७ | विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी | ७४/- | ७४/- |
| ८ | विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी | ४०/- | ४०/- |
| ९ | विद्यार्थी सहाय्य निधी | १२३/- | १२३/- |
| १० | ओळखपत्र शुल्क | ३४/- | ३४/- |
| ११ | शारीरिक क्षमता चाचणी शुल्क | २०/- | २०/- |
| १२ | विद्यापीठ आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १४/- | १४/- |
| १३ | विद्यापीठ वार्षिक शुल्क | १७१/- | १७१/- |
| १४ | शिक्षण शुल्क | ७५५१/- | ७५५१/- |
| १५ | आंतर महाविद्यालयीन क्रीडा शुल्क | ३२/- | ३२/- |
| १६ | विकास निधी | १६१/- | १६१/- |
| १७ | सायकल स्टॅन्ड | २८/- | २८/- |
| १८ | विद्यापीठ इ-सुविधा | ६८/- | ६८/- |
| १९ | आंतरविद्यापीठ खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम शुल्क | ३२/- | ३२/- |
| २० | पर्यावरण शुल्क (फक्त द्वितीय वर्षाकरीता) | १२८/- | १२८/- |
| २१ | Extra Curricular Activity | ३००/- | ३००/- |
| २२ | महाविद्यालयीन वार्षिकांक शुल्क | १३७/- | १३७/- |
| २३ | विद्यापीठ अश्वमेघ निधी | ३६/- | ३६/- |
| २४ | विविध उपक्रम | २०७/- | २०७/- |
| २५ | राष्ट्रीय सेवा योजना | १३/- | १३/- |
| २६ | जिमधाना | ४१२/- | ४१२/- |

## विद्यार्थ्यांना महत्वाच्या सुचना

१) हे माहिती पत्रक काळजीपूर्वक वाचा यातील नियमांचे काटेकोरपणे पालन करा आणि पुढील उपयोगाकरिता जवळ बाळगा.

२) महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस प्राचार्यानी वेळोवेळी केलेले नियम बंधनकारक राहतील. बेशिस्त वर्तन, गैरवर्तणूक आणि नियमभंग या कारणासाठी कडक शासन करण्यात येईल. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला महाविद्यालयाने निश्चित केलेला गणवेश बंधनकारक राहील.

३) आवेदन पत्रातील कायम पत्ता कार्यालयात नोंदविला जाईल. पत्त्यात काही बदल झाल्यास वडिल/ पालकास तसे प्रतिज्ञा पत्र सादर करावे लागेल. आवेदन पत्रावर स्थानिक पालकाचा पूर्ण पत्ता लिहावा.

४) विद्यापीठाने निश्चित केलेल्या तारखेनंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही.

५) नियमात भर घालण्याचा, नियम गाळण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील आणि झालेला बदल सुचना फलकावर लावल्या जाईल.

६) महाविद्यालयात स्नेहसंमेलन, महाविद्यालय दिन (कॉलेज डे) कुठलीही विद्यार्थ्यांची मंडळे अथवा समित्या राहणार नाहीत.

७) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी भरलेले शुल्क त्याने प्रवेश रद्द केल्यास परत केले जाणार नाहीत.

८) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्याबाहेरच्या बोर्डाची व अन्य विद्यापीठाची परिक्षा उत्तीर्ण झाले असतील त्यांनी इतर प्रमाणपत्रासोबत, स्थानांतरण प्रमाणपत्रही (Migeration Certificate) जोडावे.

९) विद्यार्थ्यांनी आवेदन पत्रासोबत शिष्यवृत्ती व विद्यापीठ नामांकन अर्ज जोडणे आवश्यक आहे. त्या शिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

१०) विद्यार्थ्यांना कला व वाणिज्य वर्गात गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश देण्यात येईल.

११) कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत इयत्ता ११ वी मध्ये गुणवत्तेच्या आधारे प्रवेश दिला जाईल.

## प्रवेश पद्धती

### विद्यार्थ्यांनी आपले आवेदन खालील प्रमाणपत्रासह दिलेल्या तारखेपूर्वी सादर करावे.

१) विद्यार्थ्यांने उत्तीर्ण केलेल्या शेवटच्या परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत.

२) शाळा/महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत.

३) जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (एस.टी., एस.सी., व्ही.जे.एन.टी., एस.बीसी., आणि ओ.बी.सी. विद्यार्थ्यांसाठी)

४) शिक्षणात खंड पडला असल्यास त्याचे प्रमाणपत्र /दाखला न्यायालयीन प्रतिज्ञापत्राच्या मुळ स्वरुपात (ॲफीडेवीट) असावा व त्यात विद्यार्थ्यांने विद्यापीठ/बोर्डाची परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर अन्य कुठल्याही संस्थेत प्रवेश न घेतल्या विषयीचा उल्लेख असावा.

५) राजपत्रित अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र (सवलती आणि शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी)

६) ज्या विद्यार्थ्यांनी पात्रता परीक्षा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ या व्यतिरिक्त इतर मंडळ वा विद्यापीठातून उत्तीर्ण केली असेल त्याला) स्थानांतरण आणि योग्यतेचे (मायग्रेशन व इलिजीबीलीटी) प्रमाणपत्र द्यावे लागेल अन्यथा प्रवेश मिळणार नाहीत.

**शिक्षणाचे माध्यम :** वरिष्ठ महाविद्यालयातील बी.ए., बी. कॉम या अभ्यासक्रमाचे माध्यम मराठी तर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखा इंग्रजी, कला शाखा मराठी आणि वाणिज्य शाखेचे माध्यम मराठी / इंग्रजी राहील.

**ओळखपत्र :** प्रवेशित विद्यार्थ्याला दरवर्षी नविन ओळखपत्र दिले जाईल. ओळख पत्राशिवाय महाविद्यालयीन विद्यार्थ्याला महाविद्यालयीन परिसरात प्रवेश करण्याची परवानगी दिल्या जाणार नाही. ओळखपत्र हरविल्यास रु. ३०/– भरुन नविन ओळखपत्र दिले जाईल. ओळखपत्राशिवाय महाविद्यालयाचे कोणतेही काम होणार नाही.

**उपस्थिती :** वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परिक्षेला बसण्यासाठी नियमानुसार प्रत्येक विषयात ८०% उपस्थिती तर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी. बोर्डाच्या परिक्षेला बसण्यास ८०% उपस्थिती आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांची शेकडा उपस्थिती निर्धारीत टक्केवारी पेक्षा कमी असेल त्या विद्यार्थ्यांना बोर्डाच्या अथवा विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्याची परवानगी नाकारण्यात येईल. तसेच प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनी विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

**महाविद्यालयीन परीक्षा :** महाविद्यलायाने ठरविलेल्या तारखांना घटक चाचण्या तसेच प्रथम सत्रांत आणि द्वितीय सत्रांत परीक्षा घेण्यात येतील या परीक्षांना प्रत्येक विद्यार्थ्यांने उपस्थित राहणे आवश्यक आहे. असे न केल्यास विद्यार्थी महाविद्यालयीन समितीने ठरविलेल्या दंडास पात्र राहील.

**ग्रंथालय :** महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध असेल अशी अपेक्षा विद्यापीठाकडून करण्यात येते. विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचावेत व आपले ज्ञान वाढवावे असा हेतू असतो या हेतूने महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध ठेवण्यात आले आहे. तसेच विषयाची संदर्भ पुस्तकेही भरपूर आहेत. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मीती मंडळा द्वारे प्रकाशित केलेली इयत्ता ११ वी १२ वी क्रमिक अभ्यासक्रमाची पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा.

**विज्ञान प्रयोगशाळा :** कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या इयत्ता ११ वी १२ वी च्या विद्यार्थ्यांकरिता Physics, Chemistry, Biology या तिन्ही विषयांच्या प्रात्यक्षिकरणाकरिता स्वतंत्र प्रयोगशाळा तयार करण्यात आल्या आहेत.

**वैद्यकीय तपासणी :**

(क)विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाने मान्यता दिलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. तपासणीची तारीख संचालक व वैद्यकीय अधिकारी ठरवतील. (ख) जर एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय अधिकारी निर्दिष्ट करतील त्या दिवशी व त्यावेळी तपासणी करुन घेतली नाही तर अशा विद्यार्थ्यांचे नाव संचालकांमार्फत वैद्यकीय अधिकारी विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाकडे कळवतील व विद्यार्थी नियमानुसार कार्यवाहीस पात्र होईल.

(ग) महाविद्यालयात प्रवेश घेताच प्रत्येक विद्यार्थ्याने त्याला दिल्या जाणाऱ्या ''अ'' नमुन्यात स्वतःच्या आरोग्याचे निवेदन दिले पाहीजे.

(घ) विद्यापीठ कार्यकारी मंडळाने नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वैद्यकीय तपासणी प्रित्यर्थ प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्क भरावे लागेल.

**संगणक कक्ष : (Computer Lab)**

महाविद्यालयात संगणक कक्ष तयार करण्यात आले असून तेथे नवीन आधुनिक संगणक बसविण्यात आले आहेत विद्यापीठातील संगणकसंबंधित विविध विषय त्या कक्षेत शिकविले जात आहेत. तसेच MS-CIT, Tally चे प्रशिक्षण कमी शुल्कात महाविद्यालयातच दिले जाते.

**सांस्कृतिक उपक्रम : (Incentive Marks 10)**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना देण्याकरीता महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम समिती कार्यरत आहे या समितीद्वारे वर्षभर विविध बौद्धिक स्पर्धांचे व उपक्रमांचे आयोजन केले जाते. रांगोळी, गीतगायन, वादविवाद, परिसंवाद, वक्तृत्व व अन्य स्पर्धातून विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचा विकास केला जातो तसेच महाविद्यालयीन, आंतरमहाविद्यालयीन व आंतरविद्यापीठीय विविध सांस्कृतीक कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमा नुसार इंसेटीव्ह मार्कस दिले जातात.



**राष्ट्रीय सेवा योजना : (Incentive Marks 10)**

आपल्या माहाविद्यालयात नागपूर विद्यापीठातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली असुन १०० विद्यार्थ्यांचे एक रा.से.यो. युनिट कार्यरत आहे. महाविद्यालयात मार्फत शक्यतो ७ दिवसाचे निवासी समाज सेवा शिबीर जवळपासच्या खेडेगावात घेऊन विविध प्रकल्प राबवीले जातात. या योजनेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जे गुण दिले जातात ते विद्यापीठाच्या गुण-पत्रिकेत दाखविण्यात येतात.

**निरंतर प्रौढ शिक्षण व विस्तार विभाग : (Incentive Marks 10)**

महाविद्यालयात ५० विद्यार्थ्यांचे एक प्रौढ शिक्षण युनिट कार्यरत असुन, नागपूर विद्यापीठातर्फे चालविण्यात येणाऱ्या निरंतर प्रौढ शिक्षण व विस्तार विभागांतर्गत संपूर्ण शैक्षणिक सत्रात महाविद्यालयीन स्तरावर व ग्रामीण स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जे गुण दिले जातात, ते विद्यापीठाच्या गुणपत्रिकेत दाखविण्यात येतात.

**शारिरीक शिक्षण : (Incentive Marks 10)**

महाविद्यालयात शारिरीक शिक्षण हा अनिवार्य विषय असून सदर विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या शारिरीक विकासासाठी महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना योगा प्रशिक्षण तसेच विविध क्रिडा प्रकारांचे शिक्षण दिले जाते. महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरीय होणाऱ्या विविध क्रिडा स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी होतात.



## पारितोषिके :

### * स्व. श्री. जे. एस. टेकाडे स्मृती गुणवत्ता पारितोषिक

महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी बी.ए. अंतिम वर्षाला विद्यापीठ परीक्षेमध्ये महाविद्यालयातुन गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला रोख रु. ११११ चे स्व. श्री. जंगलुजी सावजी टेकाडे स्मृती गुणवत्ता पारितोषिक प्रदान केले जाते.

### * स्व. सौ. बी. जे. टेकाडे स्मृती गुणवत्ता पारितोषिक

महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी बी.कॉम. अंतिम वर्षाला विद्यापीठ परीक्षेमध्ये महाविद्यालयातून गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला रोख रु. ११११/– चे स्व. सौ. भागीरथीबाई जंगलुजी टेकाडे स्मृती गुणवत्ता पारितोषिक प्रदान केले जाते.

### * स्व. प्राचार्य . डॉ. श्री. रामराव नारायणराव घोरमारे स्मृती गुणवत्ता पारितोषिक

महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी बी.ए. अंतिम वर्षाला विद्यापीठ परीक्षेमध्ये महाविद्यालयातुन राज्यशास्त्र विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला रोख रु. २१००/– चे स्व. प्राचार्य डॉ. श्री. रामराव नारायणराव घोरमारे स्मृती गुणवत्ता पारितोषिक प्रदान केले जाते.

### * राम गणेश गडकरी स्मृती गुणवत्ता परितोषीक

कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी कला, वाणिज्य व विज्ञान बोर्ड परिक्षेमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातून गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख ५०१/– चे बक्षीस महाविद्यालयातर्फे प्रदान केले जाते

(मराठी व इंग्रजी माध्यम : कला–५०१/–, वाणिज्य – ५०१/– व विज्ञान – ५०१/–)

## गणवेश

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकरिता गणवेश अनिवार्य करण्यात आला आहे. गणवेश घालून न आल्यास प्रति दिवस ५ रु. प्रमाणे दंड आकारण्यात येईल. प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसाच्या आत गणवेश घालून येणे आवश्यक राहील.

## सायकल स्टॅण्ड :

विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी सायकल स्टॅण्डची योजना केली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या सायकली त्या स्टॅण्डवरच ठेवाव्या त्यासाठी सत्राच्या आरंभी ठराविक आवेदनपत्र आणि २० रु. शुल्क भरावे लागेल सायकलीच्या सुरक्षिततेची व्यवस्था असली, तरी सायकल किंवा सायकलीचा एखादा भाग, हरविल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाकडे राहणार नाही.

## आचारसंहिता :

महाविद्यालयाने तयार केलेल्या नियमांचे व आचारसंहितेचे सर्व विद्यार्थ्यांनी पालन करणे अनिवार्य आहे.

१) वरीष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सकाळी ७.५० वाजता व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ११.५० वाजता सामुहिक प्रार्थनेला उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

२) विद्यार्थ्यांची वर्गातील आणि महाविद्यालयाच्या परिसरातील वागणूक सौजन्यपूर्वक असावी.

३) विद्यार्थ्याने प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल व महाविद्यालयीन कर्मचारी यांच्याशी नम्रतेने वागावे.

४) विद्यार्थ्यांची आपसात वागणूक सभ्य पणाची असावी.

५) विद्यार्थी–विद्यार्थिनीचा पोषाख स्वच्छ, नीटनेटका व शिष्टसंमत असावा.

६) वर्गात व महाविद्यालयाच्या परिसरात पान, तंबाखू खाणे, धुम्रपान करणे, थूंकणे आणि इतर मादक द्रव्य घेणे प्रतिबंधित आहे.

७) विद्यार्थ्यांनी वर्गासमोर अथवा व्हरांडयात घोळका करुन उभे राहणे, वर्गांना व्यत्यय आणने गैरशिस्त समजले जाईल.

८) महाविद्यालयाच्या भिंतीवर तसेच परिसरात कोठेही पत्रके, पोस्टर्स चिकटविण्यास सक्त मनाई आहे. या नियमांचा भंग केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील साधनसामुग्रीचा वापर काळजीपूर्वक करावा. नुकसान करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक किंवा प्रसंगी सामूहिक दंड वसूल केला जाऊ शकतो.

१०) कोणत्याही विद्यार्थ्यांने गैरमहाविद्यालयीन मित्रांना महाविद्यालयाच्या परिसरात घेऊन येण्यास किंवा भेटण्यास सक्त मनाई आहे.

११) कोणताही तास सुरु होऊन प्राध्यापक वर्गात येण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी वर्गात आपल्या जागेवर बसणे आवश्यक आहे.

१२) स्वतःच्या विषयाचा वर्ग सोडून इतर विषयाच्या वर्गात बसण्यास मनाई आहे.

१३) विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या संबंधित कोणतीही बाब प्राचार्यांच्या परवानगी शिवाय वृत्तपत्राकडे अथवा कोणत्याही प्रसार माध्यमाकडे पाठविता येणार नाही.

१४) महाविद्यालयात मोबाईलचा वापर कोणालाही करता येणार नाही.

१५) विद्यार्थ्यांनी आपली कोणतीही वाहने सायकल स्टॅण्डवरच ठेवावीत परिसरात वाहने फिरवू नये.

१६) प्राचार्यांच्या पूर्वसंमतीशिवाय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन कार्यक्रमाकरीता कोणत्याही अतिथीस निमंत्रित करता येणार नाही.

१७) तास नसलेल्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाच्या वाचनकक्षात बसावे.

१८) महाविद्यालयात होणाऱ्या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित असणे आवश्यक आहे. अन्यथा गैरशिस्त समजून तो विद्यार्थी दंडास पात्र राहील.

१९) महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळात सदस्य म्हणून अथवा महाविद्यालयाकडून कोणत्याही शिबिरात किंवा कार्यक्रमात

सहभागी होण्यास त्या विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती ८० टक्के असणे आवश्यक आहे.

२०) वर्गात आणि परिसरात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रवेशप्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य अपेक्षित आहे. या आचारसंहितेचा भंग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

२१) महाविद्यालयात 'रॅगींग' प्रकार होऊ नयेत म्हणून रातुम नागपूर विद्यापीठ पत्र क्र. रातुमनावि/१०/वि.का. दि. ६ एप्रिल २०१० अन्वये पत्रानुसार संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येईल. असा प्रकार महाविद्यालयात होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांनी दक्षता घ्यावी.

## शासकिय शिष्यवृत्ती आणि निःशुल्क शिक्षण :

महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, विशेष मागास वर्ग तसेच इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी शासकीय नियमानुसार शिष्यवृत्तीस/निःशुल्क शिक्षण (Freeship) याकरिता पात्र ठरतील त्या विद्यार्थ्यांना शासन नियमानुसार शिष्यवृत्ती देण्यात येईल.

**सुचना :**

१) शिष्यवृत्ती करीता आवश्यक ती कागदपत्रे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेते वेळी सादर करावे.

### निःशुल्क शिक्षण किंवा शासकीय शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याकरीता विशेष सुचनाः-

अ) निःशुल्क शिक्षण (Freeship) किंवा कोणतेही शासकीय शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक महिन्यात शेकडा ८० तासिकांना उपस्थित असणे आवश्यक आहे. उपस्थिती ८० टक्के नसेल तर त्यांना ती सवलत मिळणार नाही व त्यांना त्या महिन्याचे शिक्षणशुल्क भरावे लागेल.

ब) अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जून महिन्यातच प्रवेश घ्यावा. जूलै महिन्याचाही शिक्षण शुल्काचा हफ्ता भरावा लागेल.

## शैक्षणिक पात्रता :-

खालील तक्त्यात दर्शविलेल्या अर्हताकारी परीक्षा विविध वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने उत्तीर्ण केल्या असल्या पाहिजे.

| वर्ग | अर्हताकारी परीक्षा |
|---|---|
| इयत्ता ११ वी कला/वाणिज्य/विज्ञान | महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळांची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण |
| इयत्ता १२ वी कला/वाणिज्य/विज्ञान | इयत्ता ११ वी उत्तीर्ण |
| बी. ए. / बी.कॉम भाग-१ | महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळांची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा |
| बी. ए. / बी.कॉम भाग-२ | बी. ए. / बी.कॉम भाग-१ |
| बी. ए. / बी.कॉम भाग-३ | बी. ए. / बी.कॉम भाग-२ |

टिप : १) महाराष्ट्र राज्य उच्च मा. शिक्षण मंडळाने / विद्यापीठाने वरील परिक्षाच्या समकक्ष मानलेल्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशाकरीता अर्ज करता येईल.

२) अर्हताकरी परीक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला विद्यापीठाने पुढील वर्गात अभ्यास सुरु ठेवण्याची परवानगी (ए.टी.के.टी.) दिलेली असल्यास प्रवेशासाठी अर्ज करता येईल.

३) बी.ए. भाग - १ वर्गातील सर्व जागा गुणवत्तेनुसार व शासकीय नियमानुसार प्रवेश देऊन भरल्या जाईल.

## विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास

१) ३१ जुलै पूर्वी प्रवेश रद्द केल्यास प्रवेश शुल्क व प्रथम सत्राचे शुल्क कापून उर्वरित शुल्क परत केले जाईल.

२) ३१ जुलै नंतर प्रवेश रद्द केल्यास संपूर्ण वर्षाचे शुल्क द्यावे लागेल

३) वर्ष संपायच्या आधी केव्हाही प्रवेश रद्द केल्यास कुठलीही स्कॉलरशिप, फ्रीशिप किंवा सवलत मिळणार नाही. तसेच संपूर्ण वर्षाचे शुल्क द्यावे लागेल.

### महाविद्यालयीन वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालयाची वेळ | : | सकाळी ७.०० ते १.०० |
| कनिष्ठ महाविद्यालयाची वेळ | : | सकाळी ११.५० ते ४.३० |
| ग्रंथालयाची वेळ | : | सकाळी ९.०० ते ३.०० |
| कार्यालयाची वेळ | : | सकाळी ८.०० ते ४.०० |

# आमचे गुणवंत विद्यार्थी

## वरीष्ठ महाविद्यालय सत्र २०२३-२४



**कु. महिविश एस. शेख**
बी. कॉम. भाग - ३
महाविद्यालयातून प्रथम



**राकेश एल. चरपे**
बी. ए. भाग - ३
महाविद्यालयातून प्रथम

## कनिष्ठ महाविद्यालय सत्र २०२४-२५



**कु . गुंजनी के. अंबरते**
विज्ञान शाखा - ८५.१७%
महाविद्यालयातून प्रथम



**कु. वैष्णवी आर. आसोले**
वाणिज्य शाखा
महाविद्यालयातून प्रथम



**कु. प्राची आर. तागडे**
कला शाखा
महाविद्यालयातून प्रथम




वर्तमान पत्रांचे वाचन करतांना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी



वनभोजन करतांना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी

## भरारी

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कला-गुणांना वाव देऊन त्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने, वर्षभरातील कार्यक्रम, उपक्रम याचा लेखा-जोखा ''भरारी'' या वार्षिकांकातून सादर करण्यात येते.



वर्ष तिसरे
महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने
MITSC
करिअर कट्टा
युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....
• आयएएस आपल्या भेटीला
* राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/महाराष्ट्र लोकसेवा आयोग
* पोलीस भरती
* बँकिंग सेवा
* स्टाफ सिलेक्शन कमिशन
* केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.)
• उद्योजक आपल्या भेटीला
• भारतीय संविधानाचे पारायण
• पर्यावरण शास्त्र अभ्यासक्रम
ध्येयाच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस
सभासद शुल्क रू. ३६५
५० कोर्स मोफत
वैशिष्ट्ये
राज्यातील पदवी प्रथम वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांसाठी पहिल्या महिन्यात दोन क्रेडिटचा करिअरसाठी शासकीय व खाजगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी व उद्योजकता विकास हा दोन क्रेडिटचा कोर्स मोफत.
सर्व पद्धतीच्या स्पर्धा परिक्षेची इत्यंभूत माहिती दिली जाते, तसेच अभ्यासक्रम देखील शिकवला जातो.
५० शॉर्ट टर्म कोर्सेस मोफत प्रशिक्षण प्रति महिना पाच कोर्स याप्रमाणे.
एकदा नोंदणी केल्यास १,००० दिवस म्हणजे तीन वर्षे करिअर कट्ट्याचा लाभ घेता येईल.
करिअर कट्टा चॉईस बेस क्रेडिट सिस्टिम अंतर्गत १५ कोर्सची परीक्षा देवून प्रमाणपत्र मिळणवणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काच्या सवलतीच्या माध्यमातून ३७५ रूपये परत केले जातात.
नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ७५०७६५२५५५ या नंबरवर आपले नाव करा

## महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकेमध्ये छापवायचा इंग्रजी नमूना

## Draft to include in Prospectus

**Career Katta**

**(Career and Entrepreneurship Counseling, Skill Development, Internships, Placement, etc.)**

Career Katta is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking, SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join:**
Any student admitted for any regular course in the college or college alumni referred by College Coordinator.

**Registration Fees:** One Time Rs. 365 for Three-year degree period (Rs. 0.36 per day), which will be reimbursed in the form of subsidy on examination charges of CBCS. It including free access to all the activities, courses, State Level Competitive Exams, etc.

**How to Register:** Download the MITSC application from Google Play Store and pay fees using any online payment mode

**College Code:** A 466 (Please include the Career Katta code of the College)
**Contact:** For more details visit college webpage _________ or contact Coordinator Dr. Prashant Mandlik, Department of Chemistry, 94038 66611 or Career Katta Helpline 75076 52555

**करियर कट्टा मध्ये विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी**

SCAN ME

**यूट्यूब वरील उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सबस्क्राईब करा**

Subscribe me

**करियर कट्टा नियमित उपक्रमाची माहिती मिळवण्यासाठी सबस्क्राईब करा**

Subscribe me

**हेल्पलाइन नंबर : 750 765 2555**

# महाविद्यालयातील विविध उपक्रमांची प्रसार माध्यमाने घेतलेली दखल

**नवराष्ट्र** www.navarashtra.com

## 'उत्सव स्त्रीत्वाचा' राम गणेश गडकरी महाविद्यालयात साजरा



Orange City Metro Edition
Mar 10, 2025 Page No. 5
Powered by: Navarashtra.com

**नवराष्ट्र** www.navarashtra.com



## ताज आनंद आश्रमात रासेयोचे शिबिर थाटात

राम गणेश गडकरी महाविद्यालयाचे सातवी येथे आयोजन

**नवराष्ट्र** www.navarashtra.com

तालुकास्तरीय रस्सीखेच स्पर्धा • राम गणेश गडकरी महाविद्यालयात आयोजन

## चौरे महाविद्यालयाला विजेतेपद



Orange City Metro Edition
Jan 08, 2025 Page No. 4
Powered by: Navarashtra.com

**नवराष्ट्र** www.navarashtra.com

गडकरी महाविद्यालयात मराठी गौरव दिन

## मराठीच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढे येण्याची गरज



Orange City Metro Edition
Mar 01, 2025 Page No. 3
Powered by: Navarashtra.com

**महासागर**

## राम गणेश गडकरी कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९४.५७%



**लोकमत**

## राम गणेश गडकरी कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९४.५७ टक्के

## राम गणेश गडकरी कॉलेज में रक्तदान शिविर संपन्न



**देशोन्नती**



नॅक पिअर टीमने दिली प्रत्यक्ष भेट
विविध विभागांचे केले मूल्यांकन

## राम गणेश गडकरी महाविद्यालयाला नॅकचे बी-ग्रेड मानांकन

**नवराष्ट्र**

राम गणेश गडकरी महाविद्यालय, सावनेर



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे 'मी शेतकरी बोलतोय'



## राम गणेश गडकरी कॉलेज में टग ऑफ वॉर खेल का वर्कशॉप



**लोकमत**

छायांकित — माझा जिल्हा

## २५ विद्यार्थ्यांनी केले रक्तदान



सावनेर : महात्मा जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावनेर शहरातील राम गणेश गडकरी महाविद्यालयात कार्यक्रम व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात २५ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे आयोजन आयुष ब्लड सेंटर अँड कंपोनेंट्स लॅब नागपूर व एचडीएफसी बँक शाखा सावनेरच्यावतीने केले होते. अध्यक्षस्थानी नंदकुमार ग्रामीण विकास बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर टेकाडे तर प्रमुख अतिथी म्हणून शाखा व्यवस्थापक मनीष अडागळे, डॉ. कपिल वाडे, प्राचार्या शोभा ताजने उपस्थित होते. यावेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. अतिथी महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर...

**नवराष्ट्र**

## 'टग ऑफ वॉर' (रस्सीखेच) कार्यशाळा

राम गणेश गडकरी महाविद्यालयाचे आयोजन



## टग ऑफ वॉर (रस्सीखेच) कार्यशाळा उत्साहात

राम गणेश गडकरी महाविद्यालयाचे आयोजन



रस्साखेची प्रतियोगिता में राम गणेश गडकरी महाविद्यालय उपविजेता

## संसद ट्रॉफी खेल महोत्सव



**नवराष्ट्र**

## गडकरी महाविद्यालयाला रस्सीखेच स्पर्धेत रौप्य

खासदार चषक क्रीडा महोत्सव



**नवभारत**

## CMPDI का सतर्कता जागरूकता सप्ताह

**लोकमत**

छायांकित — माझा जिल्हा

## रस्सीखेच स्पर्धेत सावनेरचे राम गणेश गडकरी महाविद्यालय उपविजेता



...सदार चषक क्रीडा महोत्सवात सावनेर शहरातील राम गणेश ...ळाने ५७ वर्षे वयोगटात उत्कृष्ट ...मुळे या संघाला रौप्य पदकाने ...हर आणि ग्रामीण भागातील ...ळींचे संघ सहभागी झाले होते. ...ौरी कनिष्ठ महाविद्यालयाचा ...रौप्यपदक, ट्रॉफी आणि ११ ...गले. या संघातील माधवी ढोबळे, ...प्रवेरी वाडी, गुंजन कमाले, पूजा ...नपूर या खेळाडूंचा कॉलेजमध्ये ...रण्यात आला. यावेळी संस्थेचे ... टेकाडे, प्राचार्या शोभा ताजने, ...र, प्रा. शुभांगी दिवाणे, प्रा. कांतेश्वर ...क्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**नवभारत** www.navbharatlive.com

## नैक ने दिया राम गणेश गडकरी कॉलेज को बी-ग्रेड

विविध स्तर पर किया गया निरीक्षण



Nagpur Metro Edition
Dec 09, 2024 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

**लोकमत**

छायांकित — माझा जिल्हा

## सावनेरच्या राम गणेश गडकरी महाविद्यालयाला नॅकचे बी ग्रेड मानांकन



Hello Nagpur Gramin
Page No. 3 Dec 09, 2024
Powered by: erelego.com

## राम गणेश गडकरी जूनियर कॉलेज विज्ञान का परिणाम शत -प्रतिशत

**नवराष्ट्र**

## गडकरी महाविद्यालयात चित्रकला स्पर्धा

## राम गणेश गडकरी महाविद्यालयात चित्रकला स्पर्धा उत्साहात

सीएमपीडीआयद्वारा दक्षता जनजागृती सप्ताहांतर्गत आयोजन



**नवराष्ट्र**

## राम गणेश गडकरी महाविद्यालयात वृक्षारोपण



## सीएमपीडीआई द्वारा सतर्कता जागरूकता सप्ताह

>राम गणेश गडकरी कॉलेज में चित्रकला प्रतियोगिता



**लोकमत**

स्मिता भुडे : राम गणेश गडकरी महाविद्यालयात कार्यशाळा

## मुलींनो, स्वत:च्या आरोग्याला जपा!



**नवराष्ट्र**

डॉ.स्मिता भुडे, गडकरी महाविद्यालयात कार्यशाळा

## मुलींनो, प्रथम स्वत:चे आरोग्य जपा!



Orange City Metro Edition
25 November 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com

## योग्य आहार आणि व्यायामाद्वारे विद्यार्थिनींनी आरोग्याला जपावे

डॉ. स्मिता भुडे यांचे आवाहन : राम गणेश गडकरी महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन



## राम गणेश गडकरी महाविद्यालयात वृक्षारोपण



Orange City Metro Edition
09 November 2022 Page No. 3
epaper.navarashtra.com

# राम गणेश गडकरी कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९४.५७%

**दै. दिव्य वतन, वाघोडा/सावनेर** स्थानिक राम गणेश गडकरी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यावर्षीही इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेत उज्वल यश प्राप्त करून आपली यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल ९४.५७% तर वाणिज्य शाखेचा निकाल ७१.४२% इतका लागलेला आहे. विज्ञान शाखेतील कु. गुंजनी अंबरते या विद्यार्थिनीने ८५.१७% गुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम तर कुमारी कोमल पारधी व वेदांत गजभिये यांनी ७७.५०% गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तर भावेश महाजन या विद्यार्थ्याने ७४.५०% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक मिळविला आहे.



तसेच वाणिज्य शाखेतील कुमारी वैष्णवी आसोले हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे तसेच कला शाखेतील कुमारी प्राची तागडे हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव टेकाडे संस्थेचे सचिव प्रा. विजय टेकाडे महाविद्यालयाच्या प्राचार्या शोभा ताजने तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले व पुढील उज्वल भविष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## इयत्ता 12 वी विज्ञान शाखेमध्ये महाविद्यालयातून प्रथम

**85.17%**



**कु . गुंजनी के. अंबरते**

हार्दिक अभिनंदन!

* शुभेच्छुक *

**संचालक, प्राचार्या,**
**प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद**

## शैक्षणिक सत्र २०२४-२५ मधील विविध उपक्रम
























स्पर्धा परिक्षे विषयी मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा. संजय नाथे सर व मंचावर उपस्थित पोलीस निरीक्षक शैलेंद्रजी सपकाळ साहेब संस्थेचे सचिव प्रा. व्ही. एम. टेकाडे, श्री. रंभाळ सर तसेच जिजामता कन्या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक




राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामध्ये मार्गदर्शन करतांना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. मधुकरराव टेकाडे




राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामध्ये शिबीरार्थींना मार्गदर्शन करतांना मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित संस्थेचे सचिव प्रा. व्ही. एम. टेकाडे तसेच पालक प्रतिनीधी



वार्षिक स्नेह संमलेनामध्ये दिप प्रज्वलन करतांना सावनेर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे मा. आमदार सुनीलबाबु केदार तसेच संस्थेचे सचिव मा.प्रा. व्हि. एम. टेकाडे



वार्षिक स्नेह संमलेनामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सावनेर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे मा. आमदार सुनीलबाबु केदार




कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान करतांना छायाचित्र



वार्षिक स्नेह संमलेनामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना संस्थेचे सचिव प्रा. व्ही.एम. टेकाडे



वार्षिक स्नेह संमेलनामध्ये नृत्ये सादर करतांना कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी



महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपन करतांना कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वृंद



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेमध्ये वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग



नागपूर येथे झालेल्या खासदार चषक क्रिडा महोत्सव रस्सीखेच स्पर्धेत कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यलयाच्या खेळाडू विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन रौप्यपदक पटकाविले



वार्षिक स्नेहसम्मेलनामध्ये बक्षिस व प्रशस्तिपत्र वितरण करतांना मान्यवर

Nandkrupa Gramin Vikas Bahuuddeshiya Shikshan Sanstha's Saoner

Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University Affiliated

# RAM GANESH GADKARI ARTS & COMMERCE COLLEGE SAONER

## Congratulations & Thank You

**Our Institute is Accredited with 'B' Grade from NAAC**



ACCREDITED WITH GRADE B NAAC

1st Cycle



We Thanks all our advisory Boards, Faculty, Staff, Students Parents Alumni Recruiters Well Wishers

| Shri. Madhukar J. Tekade | Shri. Dhnyaneshwar P. Dahake | Shri. Vijay M. Tekade | Prof. Shobha P. Tajane |
|---|---|---|---|
| Chairman | Vice Chairman | Secretory | Principal |

# प्रवेश देणे सुरु आहे

# KLiC Authorised Center

## राम गणेश गडकरी
## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय
## खानगांव रोड, सावनेर

MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

Basic Tally

Advance Tally

Web Designing

CC++ V.B. D.T.P.

**Mkcl's Computer Typing Speed Test-30,40 WPM**

Mkcl's Authorised Center (14210426)

Twister Computer Training Academy, Saoner

पर्याय निवडा स्पर्धा परीक्षेचा।
राजमार्ग सरकारी नोकरीचा।।

## राम गणेश गडकरी महाविद्यालय
## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व अभ्यासिका केन्द्र

खानगाव रोड, सावनेर

१०वी, १२वी व पदवी पास कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी मित्रांनो तुमचे सरकारी नोकरी मिळविण्याचे स्वप्न पूर्ण करुया. आता स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी नागपूरला जाण्याची गरज नाही. आता आपल्याच सावनेर शहरात स्पर्धा परिक्षेची व बँकींगच्या परिक्षेची संपूर्ण तयारी एकाच शैक्षणिक दालनात.

**प्रवेश सुरु**

**M P S C**
P.S.I. / S.T.I. / A.S.O.
अन्य समकक्ष पदे

**BANKING**
I.B.P.S. / S.B.I.
व बँकींग क्षेत्रातील
अन्य समकक्ष पदे

**POLICE**
पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक, टंकलेखन, वरीष्ठ लिपीक, वनरक्षक, आरोग्य सेवक, जि.प. व अन्य समकक्ष पदे



## RAM GANESH GADKARI Jr. & Sr. COLLEGE, SAONER

Add. : Khangaon Road, Saoner Mob. : 95118 96710, 8888710308, 9527526385

All Print 9881207831